# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


महत्वाचे

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/बैठक/२०१२/868

दिनांक : 22 MAR 2012

प्रति,

१) मा. कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

२) मा. कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

३) सर्व प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये

४) सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर.

५) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, वि.का.।नागपूर.

**विषय :–** शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये आयोजित होणा–या राष्ट्रीय स्तरावरील सामायिक प्रवेश परीक्षेबाबत विशेष सभा बोलाविण्याबाबत....

**संदर्भ :–** १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकिर्ण २०११/प्र.क्र.३३७(अ)/तांशि–४, दि. २२.०३.२०१२.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०११/३९८, दि. २२ मार्च २०१२..

महोदय,

वरील विषयाबाबत कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय स्तरावर एकच सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यांत येणार असल्याचा प्रस्ताव केंद्रीय मानव संसाधन व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे सक्रीय विचाराधीन आहे. यासंदर्भात राज्याच्या धोरणाची रूपरेषा ठरविण्यासाठी मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक ३०.०३.२०१२ रोजी सकाळी १०.३० वाजता सिडनेहॅम महाविद्यालय, बी रोड, चर्चगेट, मुंबई–४०० ०२०** येथे बैठक आयोजित करण्यांत आली आहे. या बैठकीसाठी राज्यातील प्रत्येक प्रादेशिक विभागातून विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी, शिक्षकांचे प्रतिनिधी, शैक्षणिक संस्था/असोसिएशनचे प्रतिनिधी, सर्व एचएससी परीक्षा मंडळाचे प्रतिनिधी, संचालक, उच्च शिक्षण, विद्यापीठाचे प्रतिनिधी, शिक्षण तज्ञ यांना निमंत्रित करण्याचे शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने सदरहू बैठकीसाठी आपण उपस्थित रहावे. ही विनंती.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात आपल्या संस्थेच्या/कार्यालयाच्या संपर्कात येणा–या शिक्षक पालक संघ किंवा तत्सम घटकांना देखिल सदरहू बैठकीस आपले स्तरावरून निमंत्रित करण्यास हरकत नाही. उपरोक्त घटकांना सदर बैठकीस संबंधित संस्था/आस्थापनांमार्फत, स्वखर्चाने यावे लागेल.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र.२अ) यांना माहितीस सविनय सादर.

२) प्रोग्रामर हेच कार्यालय सदरहू पत्र या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावे.